वाचले:-१) मे. साई श्री डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. विनोदकुमार मित्तल, अतुल वल्लभ बेनके, अमित वल्लभ बेनके, राजश्री वल्लभ बेनके, अरूण रामचंद्र आडकर, शैलजा अरूण आडकर, सौ. मंगला सुर्यकांत ढमाले, रा. भोसलेनगर, रेंजहिल्स रोड पुणे यांचा दिनांक ३०/०४/२०१४ रोजीचा सहा. संचालक नगर रचना विभाग पुणे यांचेकडे केलेला अर्ज.

२) मा. आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र. मह-२/जमीन/आरआर/७७२/०३, दि.२२/९/२००३.

३) सहा. संचालक, नगर रचना पुणे यांचकडील जा. क्र. रेखांकन/एन.ए.बी.पी./मौ. आंबेगाव बु./ता. हवेली/ स.न. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै./ससंपु/३१५६, दिनांक ०२/०६/२०१४

४) महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र. टीपीएस/१८१०/२०५१/सीआर २४३१/२०१०/युडी-१३, दि. ११/०१/२०१२ रोजीची अधिसुचना.

५) महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र.नाजक २२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२ दिनांक ७/०६/२०११

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/५३४/२०१३, दिनांक १०/०१/२०१४

७) भारत सरकार, पर्यावरण व वन विभाग, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड नवी दिल्ली यांचेकडील नोटीफिकेशन क्र. F. No.१-४/२०१२-RE (Pt.) दिनांक १३/११/२०१३

८) मुख्य अग्नीशमन अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडील जा.क्र. F.B./६२८ दिनांक १७/०५/२०१४ रोजीचा ना हरकत दाखला.

९) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
(महसुल शाखा)
क्र.पमह/एनए/एसआर/९४९/१४
पुणे, दिनांक - /०९/२०१४
९/१०/२०१४

विषय:- सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशा परवानगीबाबत....
मौजे आंबेगाव बु., ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. ११/२, ११/७ पै, ११/८ पै, ११/९ पै. मधील एकुण क्षेत्र २५०००.०० चौ. मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना मंजुरी देणेबाबत...

आदेश,

मौजे आंबेगाव बु. ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. ११/२, ११/७ पै, ११/८ पै, ११/९ पै. मधील एकुण क्षेत्र २५०००.०० चौ. मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजार्थ सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी मिळावी म्हणून अर्जदार मे. साई श्री डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. विनोदकुमार मित्तल, अतुल वल्लभ बेनके, अमित वल्लभ बेनके, राजश्री वल्लभ बेनके, अरूण रामचंद्र आडकर, शैलजा अरूण आडकर, सौ. मंगला सुर्यकांत ढमाले, रा. भोसलेनगर, रेंजहिल्स रोड पुणे यांनी या कार्यालयाकडे दिनांक ३०/०४/२०१४ रोजी सहा. संचालक नगर रचना यांचे कार्यालयाकडे विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

विषयांकित क्षेत्रावर या पुर्वी या कार्यालयाकडील आदेश क्रमांक पमह/एनए/एसआर/ ८६०/२०११, दिनांक १०/१०/२०११ नुसार निवासी प्रयोजनार्थ प्रथम सुधारीत बांधकाम नकाशांना परवानगी देणेत आलेली आहे. आता त्याच क्षेत्रावर पुनश्चः सुधारीत बांधकाम नकाशांना परवानगी मिळणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.

सहा. संचालक नगर रचना पुणे यांनी त्यांचेकडील जा. क्र. रेखांकन/एन.ए.बी.पी./मौ. आंबेगाव बु./ता. हवेली/स.नं. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै./ससंपु/३१५६, दिनांक ०२/०६/२०१४ नुसार सुधारीत रेखांकन/ बांधकाम आराखडयांना मंजूरीची शिफारस केलेली आहे.

मौजे आंबेगाव बु., ता. हवेली, जि.पुणे येथील विषयांकित मिळकतींचे सादर अभिलेखांवरून खालील प्रमाणे क्षेत्र हक्कनोंदणीस दाखल असल्याचे दिसुन येत आहे.

अ.क्र.	जमिन मालकाचे नाव	स. नं.	७/१२ नुसार एकुण क्षेत्र (चौ.मी)	बिनशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मि.)
१	अरूण रामचंद्र आडकर	११/२	३५००.००	३५००.००
	शैलजा अरूण आडकर		३५००.००	३५००.००
	राजश्री वल्लभ बेनके		३५००.००	३५००.००
	अतुल व अमित वल्लभ बेनके		१३००.००	१३००.००
	मंगला सुर्यकांत ढमाले		३५००.००	३५००.००
२	मे. महालक्ष्मी लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे	११/७ पै.	८५०.००	८५०.००
३	भागीदार विनोदकुमार जयचंदलाल	११/८ पै.	८०५०.००	८०५०.००
४	मित्तल, रमेश परसराम भाटीया संजय श्रध्दानंद त्यागी	११/९ पै.	८००.००	८००.००
	एकूण क्षेत्र		**२५०००.००**	**२५०००.००**
५	मोजणी नुसार सुधीत बांधकाम नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र			२५०००.००
६	(-) रस्तारुंदी खालील क्षेत्र			०.००
७	सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशा परवानगीचे निव्वळ क्षेत्र			**२५०००.००**
८	**सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशा परवानगीचे निव्वळ क्षेत्र**			**निवासी**

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व हक्कनोंद उतारे, वन विभागाकडील राखीव वनाची यादी, व कार्यालयातील अॅलिनेशन रजिस्टर मधील नोंदी यावरुन दिसून येते की,

१) विषयांकीत क्षेत्रावर अर्जदार यांचे मालकी हक्क हे फेरफार क्र. ६९०२, ६९०३, ६९०४, ६९०५, ६९०६, १५३४४, १५३४५, व १५६८२ नुसार खरेदीने प्राप्त झालेले असुन त्यांनीच सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी मिळणेकामी विनंती अर्ज केलेला आहे.

२) या कार्यालयाकडील उपलब्ध अॅलिनेशन रजिस्टरमधील नोंदी पहाता सदर जमीन ही इनाम/ वतन संवर्गातील नसल्याचे दिसुन येते.

३) वनसरंक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांनी या कार्यालयास दिनांक १४ मे, २००९ रोजी सादर केलेली यादी व सीडी तपासली असता प्रस्तुत क्षेत्र राखीव किंवा खाजगी वन संज्ञेत येत नाही.

४) सहाय्यक संचालक नगर रचना पुणे यांचेकडील जा. क्र. रेखांकन/एन.ए.बी.पी./मौ. आंबेगाव बु./ता. हवेली/स.न. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै./ससंपु/३१५६, दिनांक ०२/०६/२०१४ रोजीचा शिफारस अहवाल पहाता, विषयाधीन जमिनीमध्ये पुर्व मंजूर प्रस्तावानुसार जागेवर विंग बी, विंग सी, विंग डी, विंग ई, विंग एफ, विंग जे, विंग एच चे पार्किंग + ९ मजले व क्लब हाऊस चे तळ + १ मजल्यांच बांधकाम पुर्व मंजुरीनुसार झालेले आहे. तसेच आता सुधारित प्रस्तावामध्ये विंग के या इमारती पार्किंग + ६ मजले ऐवजी पार्किंग + ११ मजले व इमारत एल लोअर पार्किंग + ११ मजले नव्याने प्रस्तावित केलेली आहे. विंग एफ मध्ये सदनिकांच्या क्रमांकामध्ये फेरबदल केलेले आहेत.

५) युएलसीबाबत अभिप्राय -

नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित करण्यात येऊन शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९/११/२००९ पासुन स्विकृत केलेला आहे. शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र.नाजक-१० (२००८)/ प्र.क्र.१/ २००८/ नाजकधा-१, दिनांक ०१ मार्च, २००८ अन्वये कलम १०(३)/१०(५)/२० व २१ अंतर्गत करण्यात आलेली कार्यवाही वगळता अन्य कलमांतर्गत झालेल्या कार्यवाहीबबत ना.ज.क.धा. अधिनियमांतर्गत परवानगी आवश्यकता नाही, तथापि, जमीन धारकाकडुन / विकासकाकडुन विक्री अथवा विकसन परवानगी मागीतलेल्या मिळकती संदर्भात निरसन अधिनियमाच्या संरक्षित कलमांतर्गत त्यांच्या मिळकती संदर्भात कार्यवाही झालेली नाही, या आशयाचे शपथपत्र व बंधपत्र रु. ३००/- स्टॅम्पपेपरवर घेण्यात येऊन जमिनीचे हस्तांतरण व विकसनास परवानगी देण्यात यावी अशी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार अर्जदार यांनी विहित नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र रु. ३००/- चे स्टॅम्पपेपरवर दिनांक २२/०५/२०१४ रोजी सादर केलेले आहे. सादर केलेल्या शपथपत्र व बंधपत्रानुसार विषयांकित मिळकतीबाबत विवरणपत्र दाखल केले नसल्याचे नमूद करून त्यामध्ये प्रश्नाधिन स. नं. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै. मौजे आंबेगाव बु, ता. हवेली, जि. पुणे येथील २५०००.०० चौ. मी. क्षेत्र कलम २० अन्वये सुट दिलेल्या, कलम २१ खालील योजनांचे यादीत सदर जमिनीचा समावेश आहे काय? तसेच प्रकरणामध्ये कलम ८ (४) अन्वये निर्णय होऊन अतिरिक्त क्षेत्र निरंक घोषित केले असलेस सदरचे प्रकरण आपल्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे काय? याबाबतची माहिती २० दिवसामध्ये अभिप्राय सादर करणेबाबत युएलसी कार्यालयास यापुर्वीच कळविणेत आलेले होते. परंतु अद्याप त्यांचेकडील अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच याबाबतची खात्री करूनच यापुर्वी विषयांकित क्षेत्रावर या पुर्वी या कार्यालयाकडील आदेश क्रमांक पमह/एनए/एसआर/८६०/११, दिनांक १०/१०/२०११ नुसार सुधारीत बांधकाम नकाशांना परवानगी देणेत आलेली आहे.

तसेच कार्यालयाकडे पुणे नागरी समुह कार्यालयाने त्यांचेकडील पत्र क्र.युएलसी/सीए-२/ १६१९/ २००७, दि. ०१/११/२००७ अन्वये पुणे नागरी समुहातील साविष्ठ गावातील ज्या सर्व्हे/गट क्रमांकाच्या क्षेत्रासाठी युएलसी कायदा कलम ६ अन्वये विवरणपत्र दाखल होऊन कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाहीबाबतची यादी व सीडी या कार्यालयास पाठविलेली आहे. त्या यादी व सीडीनुसार प्रश्नाधिन स. नं. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै. बाबत विवरणपत्र दाखल केलेल्या सिडी मध्ये समावेश नसल्याचे दिसुन येते.

याबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे पत्र क्र.नाजक-२२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२, दिनांक ०७/०६/२०११ नुसार ज्या प्रकरणी युएलसी कायदा कलम १०(३), १०(५) नुसार कार्यवाही झालेली नाही अथवा ती प्रलंबित आहे त्या प्रकरणी युएलसी/नागरी समूहाकडून अभिप्राय अथवा ना हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच प्रश्नाधिन मिळकतीबाबत आदेश पारीत झाल्यावर देखिल पडताळणीसाठी आदेशाची प्रत पुणे नागरी समुह यांचे कार्यालयाकडे पाठविणेत येणार आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०११ रोजीचे युएलसीकडुन प्राप्त झालेली यादी व शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ७ जुन, २०११ रोजीचे पत्रानुसार, सीआयडीकडील पत्रे, ३० संदिग्ध प्रकरणांची यादी व बनावट/बोगस आदेशांची यादी पाहता विषयांकित जमीनीचा त्यामध्ये समावेश नाही.

भारत सरकार, पर्यावरण व बन विभाग, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली यांचेकडील क्र. F. No. १-४/२०१२-RE (Pt.), दिनांक १३/११/२०१३ रोजीचे Direction under Section ५ of Envionment (Protection) Act, १९८६ चे नोटीफीकेशननुसार सदरचे गाव हे Ecologically Senetive Area (ESA) चे यादीत समाविष्ठ नाही.

मा. आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/जनरल/आरआर/ ७७२/ २००३, दिनांक २२/९/२००३ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांनी दिनांक २२/०५/२०१४ रोजीचे विहीत नमुन्यातील नोटराईज्ड करुन प्रतिज्ञापत्र व क्षतिपत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये विषयांकित जमिनीबाबत खालील नमुद केलेल्या कोणत्याही कायदयाच्या तरतुदींचा भंग झालेला नाही असे विशद केले आहे.

१. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८.
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.
३. महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९७६.
४. इनाम जमीनी खालसा करण्यासाठीचे निर्गमित केलेले विविध कायदे.
५. मुंबई तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व जमीन एकत्रिकरण करणे अधिनियम, १९४७.
६. महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम, १९७५.
७. महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४.
८. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६.
९. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९८६.

उपरोक्त नमुद कायदयातील तरतुदींचा भंग होत नसलेचे तसेच विषयांकित जमीन भोगवटादार वर्ग-२ पैकी नसलेचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

विषयांकित क्षेत्रावर या पुर्वी या कार्यालयाकडील आदेश क्रमांक पमह/एनए/एसआर/ ८६०/२०११, दिनांक १०/१०/२०११ नुसार निवासी प्रयोजनार्थ प्रथम सुधारीत बांधकाम नकाशांना परवानगी देणेत आलेली आहे. आता त्याच क्षेत्रावर पुनश्चः व्दितीय सुधारीत बांधकाम नकाशांना परवानगी मिळणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.त्यामुळे नव्याने अकृषिक सारा आकारणी करणेत आलेली नाही.

वरील परिस्थिती विचारात घेता, अर्जदार यांची निवासी प्रयोजनार्थ सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना मंजूरी मिळणेची विनंती मान्य करणेस हरकत नाही. म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६

कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे अर्जदार मे. साई श्री डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. विनोदकुमार मित्तल, अतुल वल्लभ बेनके, अमित वल्लभ बेनके, राजश्री वल्लभ बेनके, अरूण रामचंद्र आडकर, शैलजा अरूण आडकर, श्रीमती मंगल सुर्यकांत ढमाले, रा. भोसलेनगर, रेंजहिल्स रोड पुणे यांना मौजे आंबेगाव बु., ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. ११/२, ११/७ पै, ११/८ पै, ११/९ पै. मधील एकुण क्षेत्र २५०००.०० चौ. मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना सहा. संचालक, नगर रचना पुणे यांनी त्यांचेकडील जा. क्र. रेखांकन/एन.ए.बी.पी./मौ. आंबेगाव बु./ता. हवेली/स.न. ११/२, ११/७ पै., ११/८ पै, व ११/९ पै./ससंपु/३१५६, दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये केलेल्या शिफारसीस अधिन राहून खालील कोष्टकात नमुद मिळकतीवर खालील अटी व शर्तीस अधिन राहून सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देत आहे.

सुधारीत बांधकाम परवानगी मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन

अ क्र	जमीनीचे मुद्दे	जमीनीबाबतचा तपशिल
१	गावाचे नाव	मौजे आंबेगाव बु, ता- हवेली
२	सर्व्हे नंबर	११/२, ११/७ पै, ११/८ पै, व ११/९ पै.
३	मोजणी नुसार सुधीत बांधकाम नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र	२५०००.००
४	(-) रस्तारुंदी खालील क्षेत्र	०.००
५	सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशा परवानगीचे निव्वळ क्षेत्र	२५०००.००
६	सुधारीत रेखांकन/बांधकाम नकाशा परवानगीचे निव्वळ क्षेत्र	**निवासी**

सुधारीत बांधकाम आराखडयातील नकाशांचा तपशिल

नकाशे क्र.	नकाशाचा तपशिल
१/२५	एकत्रिकरणाचा नकाशा
२/२५	नियोजित इमारतीचा लेआऊट प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
३/२५	पार्किंग प्लॅन
४/२५	नियोजित विंग क्र. बी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
५/२५	नियोजित विंग क्र. बी चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन.
६/२५	नियोजित विंग क्र. सी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
७/२५	नियोजित विंग क्र. सी च्या आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन.
८/२५	नियोजित विंग क्र. डी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
९/२५	नियोजित विंग क्र. डी चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१०/२५	नियोजित विंग क्र. ई चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या

	मजल्यांचा नकाशा.
११/२५	नियोजित क्र. विंग ई चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
१२/२५	नियोजित विंग ई चा सेक्शन व एलीव्हेशन
१३/२५	नियोजित विंग क्र. एफ चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा, टेरेस प्लॅन.
१४/२५	नियोजित क्र. विंग एफ चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१५/२५	नियोजित विंग क्र. जे चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा, टेरेस प्लॅन.
१६/२५	नियोजित क्र. विंग जे चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१७/२५	नियोजित विंग क्र. एच चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
१८/२५	नियोजित क्र. विंग एच चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१९/२५	नियोजित क्र. विंग एल चा पहिला ते सातव्या व नवव्या ते आकराव्या मजल्यांचा नकाशा.
२०/२५	नियोजित क्र. विंग एल चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
२१/२५	नियोजित क्र. विंग एल चा सेक्शन व एलीव्हेशन
२२/२५	नियोजित क्र. विंग के चा पहिला ते सातव्या व नवव्या ते आकराव्या मजल्यांचा नकाशा.
२३/२५	नियोजित विंग के. चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
२४/२५	नियोजित क्र. विंग के चा सेक्शन व एलीव्हेशन
२५/२५	क्लब हाऊसचा सविस्तर बांधकाम नकाशा.

अ.क्र.	नकाशा क्र.	इमारत क्र/ विंग क्र	इमारतीची उंची	मजल्यांची संख्या	सदनिका संख्या	रिफ्युज एरीया	शेरा
१	१/२५	--	--	--	--	--	एकत्रिकरणाचा नकाशा
२	२/२५	--	--	--	--	--	नियोजित इमारतीचा लेआऊट प्लॅन, क्षेत्र विवरण तपशिल
३	३/२५	--	--	--	--	--	पार्किंग प्लॅन
४	४/२५	विंग बी	२९.००	पार्किंग + ९ मजले	३५	६८.६० चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. बी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
५	५/२५						नियोजित विंग क्र. सी चा आव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन.

६	६/२५	विंग सी	२९.००	पार्किंग + ९ मजले	३५	६८.६० चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. सी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
७	७/२५						नियोजित विंग क्र. सी च्या आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन.
८	८/२५	विंग डी	२९.०० मी.	पार्किंग + ९ मजले	३५	७९.७१ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. डी चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
९	९/२५						नियोजित विंग क्र. डी चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१०	१०/२५	विंग ई	२९.०० मी.	पार्किंग + ९ मजले	५३	७९.३४ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. ई चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
११	११/२५						नियोजित क्र. विंग ई चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
१२	१२/२५						नियोजित विंग ई चा सेक्शन व एलीव्हेशन
१३	१३/२५	विंग एफ	२९.०० मी.	पार्किंग + ९ मजले	३५	७९.३३ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. एफ चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा, टेरेस प्लॅन.
१४	१४/२५						नियोजित क्र. विंग एफ चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन,

							सेक्शन व एलीव्हेशन
१५	१५/२५	विंग जे	२९.००	पार्किंग + ९ मजले	३५	७८.९२ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. जे चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा, टेरेस प्लॅन.
१६	१६/२५						नियोजित क्र. विंग जे चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१७	१७/२५	विंग एच	२९.००	पार्किंग + ९ मजले	३५	८०.७२ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित विंग क्र. एच चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व नवव्या मजल्यांचा नकाशा.
१८	१८/२५						नियोजित क्र. विंग एच चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन, सेक्शन व एलीव्हेशन
१९	१९/२५	इमारत क्र. एल	३५.९५ मी	लोअर पार्किंग + अप्पर पार्किंग + ११ मजले	६५	७१.५३ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित क्र. विंग एल चा पहिला ते सातव्या व नवव्या ते आकराव्या मजल्यांचा नकाशा.
२०	२०/२५						नियोजित क्र. विंग एल चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
२१	२१/२५						नियोजित क्र. विंग एल चा सेक्शन व एलीव्हेशन
२२	२२/२५	विंग के	३५.९५ मी	पार्किंग + ११ मजले	६५	७१.४९ चौ.मी. ८ व्या मजल्यांवर	नियोजित क्र. विंग के चा पहिला ते सातव्या व नवव्या ते आकराव्या मजल्यांचा नकाशा.
२३	२३/२५						नियोजित विंग के. चा आठव्या मजल्यांचा प्लॅन व टेरेस प्लॅन.
२४	२४/२५						नियोजित क्र. विंग के चा

							सेक्शन व एलीव्हेशन
२५	२५/२५	क्लब हाऊस	०७.६५ मी.	तळ + १ मजला	--	--	क्लब हाऊसचा सविस्तर बांधकाम नकाशा.

अटी व शर्ती

१) सदरची परवानगी ही महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ व त्याखालील नियमान्वये देणेत येत आहे.

२) रेखांकनातील भुखंड/इमारती हे प्रादेशिक योजना तसेच प्रचलित नियावालतील निवासी विभागामध्ये अनुज्ञेय असलेल्या कारणांसाठीच वापरणे आवश्यक आहे.

३) येथे कोणतेही विकास कार्य सुरू करण्यापुर्वी हे रेखांकन जागेवर आखुन भूमि अभिलेख विभागाकडून प्रमाणित करून घ्यावे लागेल. रेखांकन जागेवर आखलेवर, भुखंडाचे किमान क्षेत्रफळ, नकाशावर दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. तसेच रस्त्यांची रूंदी १५% सुविधा जागा १०% व खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता उपयोगी नाही. यामध्ये काही फेरफार झाल्यास अभिन्यास पुन्हा मंजूर करून घ्यावा लागेल. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत नगर रचना विभाग व या कार्यालयाकडे सादर करून त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करणेत येऊ नये.

४) रेखांकनातील रस्ते, गटारे, इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरीत करण्यापुर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

५) अभिन्यासातील रस्ते यांची देखभाल अर्जदाराने करावयास हवी. अन्यथा ते देखभाल करण्यासाठी सुयोग्य प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावेत. या जागा व रस्ते सर्व जनतेच्या वापरासाठी खुले असतील. तसेच रस्ते शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवले पाहिजेत.

६) वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर रहिवास वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

७) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे लोअर पार्किंग + अप्पर पार्किंग + ११ मजले/पार्किंग + ११ मजले या पेक्षा जास्त असू नये.

८) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम ठेवणे आवश्यक असून सदर जागा कायम खुली ठेवावी.

९) नियोजित बांधकामाचे, भुखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरून एकुण क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते/ रस्तारुंदीक्षेत्र वगळता उर्वरीत निव्वळ क्षेत्राच्या बांधकाम नकाशावरती दर्शविले इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.

१०) नियोजित इमारती मध्ये १/८ रूमच्या क्षेत्रा इतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.

११) नियोजित इमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापुर्वी अर्जदाराने केली पाहिजे.

१२) नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३) प्रस्तावासोबत मो.र.न. ५४६/२०११, दिनांक ०४/०७/२०१३ अन्वये केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हददीचे आधिन राहून सदरची शिफारस करणेत येत आहे. विषयाधीन जमीनीची वहीवाट / हददीचे अनुषंगाने काही वाद / न्यायालयीन वाद उद्भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल व अशा प्रकरणी परवानगी आदेश आपोआप रद्द होईल.

१४) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहीजे.

१५) विषयांकित रेखांकन व बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा: ७/१२ उतारे, कुळमुखत्यारपत्र, संम्मतीपत्र, मोजणी नकाशा इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत अर्जदार / मालक जबाबदार राहतील.

१६) विषयांकित बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र याबाबतीत केलेली आहे. बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

१७) स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

१८) रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

१९) सौर उर्जेवर पाणी तापविण्यासाठीची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतो सौर उर्जेवर रस्त्याच्या लगतचे पथदिवे बसविण्याचे आहेत.

२०) वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे. व पाण्याचा फेर वापर बगीचा, झाडाची जोपासना यासाठी करणे आवश्यक आहे.

२१) विषयांकित मिळकतीवर या पुर्वी या कार्यालयाकडील आदेश क्रमांक पमह/एनए/एसआर/ ८६०/२०११, दिनांक १०/१०/२०११ नुसार बांधकाम नकाशांना देणेत आलेली परवानगी रद्द समजणेत यावी. परंतू सदर आदेशातील अटी व शर्ती या अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

२२) विघटन होणाऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडूळखत प्रकल्प अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

२३) शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. टिपीव्ही- ४३०८/४१०२/ प्र. क्र. ३५९/०८/नवि-११ दि. १९/११/२००८ नुसार बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकूण चटईक्षेत्र नमूद केलेले आहे. याबाबत गणितिय चुका इ. बाबत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

२४) सदर भूखंडाचे बांधकाम क्षेत्रफळ ५००.०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे त्यामुळे प्रत्येक ८०.० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड या प्रमाणे वृक्षलागवड करणे व जोपासना करणे बंधनकारक राहील.

२५) प्रस्तुत प्रकरणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरू केलेनंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही व सदरचे बांधकाम पुर्ण झालेनंतर वापर सुरू करणेपुर्वी वर नमुद सर्व अटींची पुर्तता करून भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदारावर बंधकनकारक राहील अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

२६) उक्त बिनशेतीसाठी प्रस्तावित जागेचे अथवा गट नंबर मधील उर्वरीत जागेचे तुकडे पाडून अथवा गुंठेवारी प्रमाणे अनधिकृत्यरित्या भुखंड पाडता येणार नाहीत. किंवा विक्री करता येणार नाही. अशाप्रकारे अनधिकृतरित्या तुकडे पाडल्यास किंवा विक्री केल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

२७) १५ मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीबाबत -

a) 'अ' वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.१३.४(ii) नुसार प्रस्तावित इमारतीसभोवताली ६ मी. रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनाचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल याप्रमाणे डिझाईन करुण विकसीत करणेची जबाबदारी विकासकर्त्याची / अर्जदाराची राहील.

b) अर्जदारांनी प्रस्ताविल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याचबरोबर वाहनतळ सुविधा शासनाने दि. २८.८.२००९ च्या नोटीसी अन्वये अंतिम केलेल्या नियमानुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c) नगर विकास विभागाच्या दि. २८.८.२००९ रोजीच्या अधिसुचना प्रमाणे नियम क्र. ४ मधील टीप - ii प्रमाणे जवळच्या महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी १५ मी. पेक्षा उंच इमारतीच्या नियोजनातील जिन्याचे लिफ्टचे स्थान मान्य केलेले आहे. तथापि या कार्यालयाकडून मंजूरीसाठी शिफारस केलेल्या या बाबतचे नियोजनानुसार इमारतीचे नियोजनात बदल करणे आवश्यक झाल्यास पुन्हा मुख्य अग्निशमन अधिकारी यांची मंजुरी घ्यावी लागेल. तसेच प्रत्येक इमारतीमधील एक स्टेअरकेस व एक लिफ्ट NBC मधील तरतुदीप्रमाणे फायर रेजिस्टन्ट असणे आवश्यक आहे. तसेच उंच इमारतीचे नियोजना अनुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी पुणे महानगर पालिका यांनी दि. १७/०५/२०१४ चे पत्र क्र. FB/६२८ ने दिलेल्या Provisional Fire N.O.C. मधील अटी / शर्ती ची पूर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहिल.

d) 'अ' वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. ६.२, ६.१ नुसार बाबींची पुर्तता तसेच अग्निप्रतिबंधकन उपाययोजनाबाबत परिशिष्ट पी मधील बाबींची पुर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

e) नेहमीच्या वापराशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, सांडपाणी, कचरा विल्हेवाट इत्यादी बाबींची पुर्तता अर्जदाराने स्वखर्चाने, स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f) "अ" वर्ग नियमावलीतील नियम क्र. १८.१ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g) अशा विकासासाठी इमारतीचे Structural Stability बाबत शासनाच्या नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र अर्जदाराने आपले कार्यालयात व या कार्यालयात दाखल करणे आवश्यक राहील.

h) विकासकाने जोत्यापर्यंतचे बांधकामा केल्यानंतर जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविणे आवश्यक आहे. जोत्यापर्यंतच्या बांधकामांना जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रमाणित केल्यानंतरच पुढील बांधकाम करावे. तसेच त्यानंतरसुध्दा बांधकाम परवानगीनुसार सुरु आहे किंवा कसे याची शहानिशा जिल्हाधिकारी, पुणे यांना करता येईल. जोत्याचे बांधकाम तसेच प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अथवा वेळोवेळी असे बांधकाम/इमारतीची तपासणी करण्याकरिता उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना सूचना द्याव्यात. तसेच जिल्हाधिकारी, पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधींनी, सहायक संचालक, नगर रचना यांचे कार्यालयातील तांत्रिक अधिकारी यांचे मदतीने अशा इमारतीचे बांधकाम दिलेल्या परवानगीनुसार व अटीनुसार सुरु असल्याची खातरजमा करावी.

i) अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे व असे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्वः- अग्नीशनम यंत्रणेची पुर्तता व वर नमुद अटींची पूर्तता होणे आवश्यक राहील.

j) विषयाधीन जागेवर, विषयाधीन जमिमनीचा ग.नं. निहाय तपशिल, जमिन मालकाचे नांव, विवकासकाचे नांव, वास्तुशिल्पीचे नाव, बिनशेती परवाना क्र. इत्यादी आशय दर्शविणारा योग्य आकाराचा फलक लावणे आवश्यक राहिल.

२८) सदर प्रकल्पातील नियोजित बांधकाम विकासासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. विजय रूईकर, पुणे यांची नेमणुक करण्यास आली असून त्यांनी लेटर हेडवर हमीपत्र सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केल्यानुसार नियोजित बांधकामाचे स्थिरतेबाबत, बांधकामाबाबतचा दर्जा व गुणवत्तेबाबत संपुर्ण जबाबदारी स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्यावर राहील.

२९) सदर प्रकरणी सुधारित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार अनुज्ञेय २०% पेड चटईक्षेत्र निर्देशांक ३८१९.४२ चौ.मी. यासाठी रक्कम रू. ६९,४३,८२०/- (अक्षरी - एकोणसत्तर लाख त्रेचाळीस हजार आठशे वीस रू. फक्त) प्रिमियम आकारणी करून चटईक्षेत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३०) खुल्या जागेतील प्रस्तावित इमारतीचा वापर नकाशावर नमुद सार्वजनिक वापरासाठीच करणेचा आहे. या वापराव्यतिरिक्त अन्य कारणासाठी इमारतीचा वापर सुरू केलेचे निदर्शनास आलेस सदरची शिफारस रद्द समजणेत यावी.

३१) सादर प्रस्तावातील जमिनीमध्ये प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्र ३६६०३.०३ चौ.मी. आहे. तथापि प्रस्तावाखालील जमिनीवर अनुज्ञेय होऊ शकरणारे कमाल बांधकाम क्षेत्र अंदाजित ४२७५०.०० चौ.मी. आहे. तसेच लगतच्या अर्जदार यांच्या मालकीचे सदर प्रकरणी राज्यस्तरीय State Enviornment Impact Assessment Authority कडून Enviornment Clearance प्रमाणपत्र क्र. SEAC २०१०/CR-५४२/TC-२, दिनांक ३०/०६/२०११ अन्वये प्राप्त असून यामधील अटींची पुर्तता करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्रामध्ये बांधकामाचे क्षेत्र ३१८५४.०० चौ.मी. अनुज्ञेय केलेले आहे. सदर प्रस्तावातील एकुण बांधकामाचे क्षेत्र ३६६०३.०३ चौ.मी. क्षेत्र असून भविष्यातील अनुज्ञेय होणारे अंदाजित बांधकाम क्षेत्र ४२७५०.०० चौ.मी. येते. पर्यावरण विभागाकडील दिनांक ३०/०१/२०१४ पत्र क्र. SEIAA-२०१४/CR-०२/TC-३ अन्वये नमूद केल्याप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील व जागेवर State Enviornment Impact Assessment Authority कडून Enviornment Clearance प्रमाणपत्र घेतल्यानंतरच बांधकामास सुरूवात करण्यात यावे असे नमुद केले आहे. त्यानुसार "सदरचे बांधकाम नकाशे हे पर्यावरण विभागाकडील सुधारीत Environment Clearance प्रमाणपत्र मिळणेस अधिन राहून मंजुर करणेत आले आहेत. प्रत्यक्षात जागेवर पूर्व मंजुर पर्यावरण विभागाकडील Environment Clearance प्रमाणपत्रामध्ये नमुद बांधकाम क्षेत्राचे वर सुधारीत Environment Clearance मिळालेशिवाय बांधकाम /विकास करता येणार नाही." प्रस्तुतबाबत अर्जदार यांनी दिनांक १३/०८/२०१४ रोजी सादर केलेला इंडेम्निटी बॉन्ड अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३२) सदर प्रकरणी प्रादेशिक योजनाक्षेत्रासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २१/११/२०१३ पासून लागू केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.२.११ नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबतचे दर व कार्यपध्दती अद्याप शासनाकडून विहीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित जमिन मालक यांनी

दिनांक ३०/०५/२०१४ अन्वये नोटराईजड् बंधपत्र सादर केलेले आहे. सदरचे बंधपत्र अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३३) प्रस्तुत जमीनीवर भविष्यात नजराणा रक्कम, अकृषिक साऱ्यांची फरकाची रक्कम, तडजोड शुल्क अशी काही शासकीय रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास उपरोक्त रक्कमा भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

३४) प्रस्तुत जमिनीबाबत दिवाणी, फौजदारी व इतर स्वरूपाचा दावा चालू असले तर सदर न्यायालयाचा निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील.

३५) अर्जदाराने सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची / दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तूतची मंजुरी रद्द समजणेत येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी, पुणे.

प्रति,

मे. साई डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. विनोदकुमार मित्तल,
अतुल वल्लभ बेनके व इतर, रा. भोसलेनगर, रेंजहिल्स रोड पुणे